# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहराकरीता पेंच जलाशयातुन ११२ दलघमी नियमीत
**{जलप्रदाय विभाग}** आरक्षण प्रकल्प अहवालानुसार सन १९८१ पासुन आहे. नागपूर शहराची वाढीव पाण्याची मागणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र. CAD-१०५७/८३२ (१९९/९७)CAD (१xA) दिनांक २१/०३/१९९८ अन्वये ७८ दलघमी अतिरिक्त पाण्यास तात्पुरत्या स्वरुपात प्रथम जुन, २००५ पर्यत पाणी आरक्षणास मंजुरी दिली. त्यानंतर शासनाने त्यांचे निर्णय क्र. सी.डी.ए.१००६/८१३०/२००६ लाक्षेवि (कामे) दि. २८/०४/२००६ अन्वये उपरोक्त मंजुरीस डिसेंबर २०१० पर्यत मुदत वाढ देतांना ८४४५ हेक्टर सिंचन क्षेत्रात कपातीचे पुर्नस्थापना खर्च रु. ८४४५ लक्षचा भरणा शासनाकडे बंधणकारक राहिल अशी अट होती.

रु. ८४४५ लक्षच्या पुर्नस्थापना खर्चातुन मनपास सुट मिळणेबाबत विभागाद्वारे शासनस्तरावर अनेकदा पत्र व्यवहार करण्यात आला परंतु यावर शासन स्तरावर निर्णय प्रलंबीत होता. या दरम्यान ७८ दलघमी अस्थायी आरक्षणाच्या करारनाम्याची मुदत २५ फेब्रुवारी, २०२५ पर्यत होती ती संपुष्टात आली आहे. ७८ दलघमी अस्थायी आरक्षाची मुदत संपल्यामुळे पेंच जलाशयातुन पाणी पुरवठा करण्यात येणार नाही किंवा करारनामा नसल्याबाबची दंडणीय आकारणी करण्यात येईल असे जलसंपदा विभाग यांनी त्यांचे पत्र क्र. २३७५/तांशा-२/बिंसिं./२०२५ दि. २०/०३/२०२५ अन्वये कळविले होते.

मात्र अवर सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. बिसिंआ-२०१८/प्र.क्र.२२/१८/सिंव्य (धो) दि. २०/०३/२०२५ चे पत्रान्वये नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना पेंच नवेगांव खैरी जलाशयातुन वार्षीक ७६ दलघमी पाणी आरक्षणामुळे सिंचन क्षेत्र कपातीचा पुर्नस्थापना खर्च रु. ८४.८५ कोटी हे पाच वर्षात पाच समान वार्षीक हप्त्यामध्ये भरण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे असे कळविले आहे.

नागपूर शहराची वाढ झपाटयाने होत असल्याने उन्हाळयात पाण्याचे मागणीत मोठया प्रमाणात वाढ होते त्यामुळे नागपूर शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याचे दृष्टीने ७८ दलघमी पाण्याची आवश्यकता आहे. परंतु उपरोक्तप्रमाणे रु. ८४.४५ कोटी हे पाच वर्षात पाच समान वार्षीक हप्त्यामध्ये न भरता पाणी उचल केल्यास मनपास दंडणीय आकारनीने पाणीपट्टीचे भुगतान जलसंपदा विभागास करावे लागेल. मजनिप्रा यांचे प्रचलित धोरणानुसार करारनामा न करता पाणी उचल केल्यास दुप्पट दराने पाणी आकारणी करण्याचे तसेच मंजुर पाणी मात्रेपेक्षा १२५% पाणी वापर केल्यास १.५० पटीने व १२५% पेक्षा जास्त वापर केल्यास ३ पटीने दंडणीय आकारणी करण्याचे सुध्दा प्रावधान आहे.

वरिल बाबी लक्षात घेता खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१) शासनाचे दि.२०/०३/२०२५ चे आदेशान्वये पेंच नवेगांव खैरी जलाशयातुन वार्षीक ७६ दलघमी पाणी आरक्षणामुळे सिंचन क्षेत्र कपातीचा पुर्नस्थापना खर्च रु. ८४.८५ कोटीचे भुगतान ५ वर्षात ५ समान वार्षीक हप्त्यामध्ये जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांना भुगतान करणे.

२) रु. ८४.८५ कोटीचे भुगतान ५ वर्षात ५ समान वार्षीक हप्त्यामध्ये भुगतान करावयाचे असल्याने दरवर्षी रु.१६.९७ कोटीप्रमाणे पद क्र. A४३८०१९४०७०१ अंतर्गत तसेच ५ वर्षापर्यत भुगतान करणेस मंजुरी प्रदान करणे.

३) पेंच नवेगांव खैरी जलाशयातुन वार्षीक ७८ दलघमी पाणी कायम स्वरुपी आरक्षणीत करण्याबाबत जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेसोबत करारनामा करणे.

**टिप**:- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 07/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 07/05/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (जलप्रदाय), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहराकरीता पेंच जलाशयातुन ११२ दलघमी नियमीत आरक्षण प्रकल्प अहवालानुसार सन १९८१ पासुन आहे. नागपूर शहराची वाढीव पाण्याची मागणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र. CAD-१०५७/८३२ (१९९/९७)CAD (१xA) दिनांक २१/०३/१९९८ अन्वये ७८ दलघमी अतिरिक्त पाण्यास तात्पुरत्या स्वरुपात प्रथम जुन, २००५ पर्यत पाणी आरक्षणास मंजुरी दिली. त्यानंतर शासनाने त्यांचे निर्णय क्र. सी.डी.ए.१००६/८१३०/२००६ लाक्षेवि (कामे) दि. २८/०४/२००६ अन्वये उपरोक्त मंजुरीस डिसेंबर २०१० पर्यत मुदत वाढ देतांना ८४४५ हेक्टर सिंचन क्षेत्रात कपातीचे पुर्नस्थापना खर्च रु. ८४४५ लक्षचा भरणा शासनाकडे बंधणकारक राहिल अशी अट होती.

रु. ८४४५ लक्षच्या पुर्नस्थापना खर्चातुन मनपास सुट मिळणेबाबत विभागाद्वारे शासनस्तरावर अनेकदा पत्र व्यवहार करण्यात आला परंतु यावर शासन स्तरावर निर्णय प्रलंबीत होता. या दरम्यान ७८ दलघमी अस्थायी आरक्षणाच्या करारनाम्याची मुदत २५ फेब्रुवारी, २०२५ पर्यत होती ती संपुष्टात आली आहे. ७८ दलघमी अस्थायी आरक्षाची मुदत संपल्यामुळे पेंच जलाशयातुन पाणी पुरवठा करण्यात येणार नाही किंवा करारनामा नसल्याबाबची दंडणीय आकारणी करण्यात येईल असे जलसंपदा विभाग यांनी त्यांचे पत्र क्र. २३७५/तांशा-२/बिंसिं./२०२५ दि. २०/०३/२०२५ अन्वये कळविले होते.

मात्र अवर सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. बिसिंआ-२०१८/प्र.क्र.२२/१८/सिंव्य (धो) दि. २०/०३/२०२५ चे पत्रान्वये नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना पेंच नवेगांव खैरी जलाशयातुन वार्षीक ७६ दलघमी पाणी आरक्षणामुळे सिंचन क्षेत्र कपातीचा पुर्नस्थापना खर्च रु. ८४.८५ कोटी हे पाच वर्षात पाच समान वार्षीक हप्त्यामध्ये भरण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे असे कळविले आहे.

नागपूर शहराची वाढ झपाटयाने होत असल्याने उन्हाळयात पाण्याचे मागणीत मोठया प्रमाणात वाढ होते त्यामुळे नागपूर शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याचे दृष्टीने ७८ दलघमी

पाण्याची आवश्यकता आहे. परंतु उपरोक्तप्रमाणे रु. ८४.४५ कोटी हे पाच वर्षात पाच समान वार्षीक हप्त्यामध्ये न भरता पाणी उचल केल्यास मनपास दंडणीय आकारनीने पाणीपट्टीचे भुगतान जलसंपदा विभागास करावे लागेल. मजनिप्रा यांचे प्रचलित धोरणानुसार करारनामा न करता पाणी उचल केल्यास दुप्पट दराने पाणी आकारणी करण्याचे तसेच मंजुर पाणी मात्रेपेक्षा १२५% पाणी वापर केल्यास १.५० पटीने व १२५% पेक्षा जास्त वापर केल्यास ३ पटीने दंडणीय आकारणी करण्याचे सुध्दा प्रावधान आहे.

वरिल बाबी लक्षात घेता खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१) शासनाचे दि.२०/०३/२०२५ चे आदेशान्वये पेंच नवेगांव खैरी जलाशयातुन वार्षीक ७६ दलघमी पाणी आरक्षणामुळे सिंचन क्षेत्र कपातीचा पुर्नस्थापना खर्च रु. ८४.८५ कोटीचे भुगतान ५ वर्षात ५ समान वार्षीक हप्त्यामध्ये जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांना भुगतान करणे.

२) रु. ८४.८५ कोटीचे भुगतान ५ वर्षात ५ समान वार्षीक हप्त्यामध्ये भुगतान करावयाचे असल्याने दरवर्षी रु.१६.९७ कोटीप्रमाणे पद क्र. A४३८०१९४०७०१ अंतर्गत तसेच ५ वर्षापर्यत भुगतान करणेस मंजुरी प्रदान करणे.

३) पेंच नवेगांव खैरी जलाशयातुन वार्षीक ७८ दलघमी पाणी कायम स्वरुपी आरक्षणीत करण्याबाबत जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेसोबत करारनामा करणे.

उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.